# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक ०६.०७.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०५.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २६ केसेसमध्ये २६ ईसमांवर कारवाई करून ४७,२४७/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ इसमावर कारवाई करुन ८,३६०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,०८६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८१,२००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ पोलीसांची कामगीरी :— फसवणूक करणाऱ्या आरोपीस राजस्थान येथून अटक.**

पोलीस ठाणे बेलतरोडी हद्यीत, प्लॉट क्र. ११५, बालाजी मंदीरजवळ, शुभांगी नगर—२ येथे राहणारे फिर्यादी रघुनाथप्रसाद कुमार गुजर वय ५७ वर्षे यांचे घराजवळच शिव ग्रॅनाईट शॉप असून ते ग्रॅनाईट खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. दिनांक ३१.०१.२०२६ चे १०.०० वा. ते ०९.०२.२०२६ चे १२.५० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांचे इंस्टाग्राम आयडीवर मोबाईल क्र. ७८७७२७९२६९ व ७३९७९०८९४५ चा धारक संदीप महेंद्र चारण याने व्हिडीयो कॉल करुन फिर्यादी यांना स्वस्त दरात ग्रॅनाईट मिळवून देतो, माझेकडून खरेदी करा असे सांगून फिर्यादीस ग्रॅनाईटचे फोटो तसेच व्हिडीयो दाखविले. फिर्यादी यांचा विश्वास बसल्याने, त्यांनी आरोपीस ऑनलाईन एकूण ३,३५,०००/— रुपये पाठविले. आरोपीने फोन बंद करुन तसेच कोणताही माल न पाठविता फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन फसवणूक केली. फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भा.न्या.सं. सहकलम ६६(क) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासात, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांनी, तांत्रिक तपास करुन, आरोपीचा शोध घेऊन आरोपी हा राजस्थान येथील असल्याचे निष्पन्न केले व पाळत ठेऊन, सापळा रचून गाव खुंडीया, सरदार शहर, जि. चुरु, राजस्थान येथून आरोपी संदीप महेंद्रदान चारण वय २९ वर्ष यास त्याचे राहते घरुन ताब्यात घेतले. आरोपीची अधिक विचारपूस केली असता, आरोपी हा इतर चार गुन्हयांमध्ये पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीस पुढील कारवाईस्तव बेलतरोडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. बाबुराव राऊत, पोउपनि जितेश आरवेल्ली, पोहवा. सतिश ठाकरे, अजय यादव, पोअं. गोविंद देशमुख यांनी केली आहे.



**३) सक्करदरा पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.०७.२०२६ चे १९.०० वा. ते २०.२५ वा. चे दरम्यान, सक्करदरा पोलीसांचे पथक पेट्रोलींग करीत असतांना, पोलीस ठाणे हद्दीत सोनझरी नगर ते सुर्वे ले आऊट रोड, सक्करदरा लेक गार्डनचे भिंतीलगत, फुटपाथवर एक इसम संशयीतरित्या पिशवीसह दिसल्याने, त्यास थांबवून त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव विजय देवानंद ताजने वय २६ वर्ष रा. रानी भोसले नगर, भांडेप्लॉट असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन पंचासमक्ष त्याची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातील पोपटी रंगाचे पिशवीमध्ये ७३ नग प्लॉस्टीक पाऊच मध्ये हिरवट रंगाचा अंमली पदार्थ गांजा एकुण ४४४ ग्राम कि. ८,८८०/— रु. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(अ),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. रोशन पंडीत सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. रमेश खुणे, दुपोनि. मनोज पवार, पोउपनि महेश पांडे, पोहवा धमेंद्र नितनवरे, पोअं. किशोर हाते, दीपक रोहने, संदीप लोलुसरे व शरदसिंग टेंभरे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे मानकापूर :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत प्लॉट क्र. ३९ ए, किराडे ले आऊट, पोस्ट ऑफीस मागे राहणारे फिर्यादी जॉर्ज झेविअर पिल्ले वय ६१ वर्ष यांनी दिनांक ०४.०७.२०२६ रोजी ११.०० वा. त्यांची पत्नी यांना वीज बील भरण्याकरीता पैसे मागितल्याने पत्नीने पैसे काढणेकरीत आलमारी पाहिली असता, फिर्यादीचे पत्नीस आलमारीमध्ये ठेवलेले सोन्याचे वेगवेगळे दागिने व पेंशनचे रोख ५०,०००/— रुपये दिसून आले नाही. दिनांक ०१.०७.२०२६ चे १५.०० वा. ते दिनांक ०४.०७.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे उघडे दारातुन आंत प्रवेश करून, घरातील आलमारीतील किंमती ३,१३,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि. छगन शिंगणे

९९२३६९६८३९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०५.०७.२०२६ चे २३.५० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, आठवा मैल बसस्टॉपजवळ एक इसम धुमधाम करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम हातात लाकडी दांडा घेऊन आरडाओरडा करतांना दिसल्याने, त्यास ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नारु उर्फ नरेंद्र रामखिलावन पांडे वय ३६ वर्षे रा. रामजी आंबेडकर नगर, बेले आटा चक्कीमागे, नागपूर असे सांगीतले. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणून त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने लाकडी दांडयासह धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे लकडगंज:— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०६.०७.२०२६ चे ०३.४० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, नेहरु पुतळा, इतवारी येथे एक इसम शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा एक ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल गणेश हजारे वय २३ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, गली क्र. १ सेव्हन स्टार हॉस्पिटल मागे, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पोलीस ठाणे यशोधरानगर :—** पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, विनोबा भावे नगर, गल्ली क्र. १८ येथे राहणारे फिर्यादी चंदु हिरालाल शाहू वय ३१ वर्ष यांचे कांजी हाऊस चौक, शाहू मोहल्ला, नागोबा वाडी, सिध्दार्थ शाळेच्या मागे असलेल्या घराचे दुरुस्ती काम चालू होते. दिनांक ०५.०७.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास घराची भिंत तोडत असता, काम करणाऱ्या एका अनोळखी ४० वर्षे वयाचे मजुराचे अंगावर भिंत पडल्याने मजुर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता मेयो रुणालय येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास मजुरी कामाकरीता रानी दुर्गावती चौकातील मजुर ठिय्यावरुन आणण्यात आले होते. मृतकाने अंगात राखाडी रंगाचा टिशर्ट व काळया रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. नमुद माहिती व वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे यशोधरानगर येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे मपोउपनि. स्वाती देशमुख ९३७३५३५३९१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/–

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.